R.T.E.अन्वये शाळा मान्यता प्रमाणपत्र

जा.क्र./जिप/शिवि/खाप्राशा-५/४३८२/२०२६
कार्यालय शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद, अकोला.
दिनांक:- २४/०८/२०२६

**प्रति,**
मुख्याध्यापक.
स्कुल ऑफ स्कॉलर्स हिंगणा रोड,
कौलखेड अकोला ता.जि.अकोला

**विषय**:- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या ११. पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी या आधारे, मी रतनसिंग पवार, शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प. अकोला **०१/०४/२०२५** पासुन **दिनांक ३१/०३/२०२८** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ते ३/४/५ **इयत्ता १ ते ८** इयत्ता ८ ते १० इयत्ता ८ वी ला स्कुल ऑफ स्कॉलर्स हिंगणा रोड, कौलखेड अकोला ता.जि.अकोला या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र) एक आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ जोडपत्र दोन मधील तरतुदीचे, शाळा पालन करेल
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईल पर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाच अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांना किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही, किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत शाळेतुन कादुन टाकण्यात येणार नाही.
(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होई पर्यत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल
(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याच्या अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१ ) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करण्या-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-य शिक्षकांना असी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मधील विनिर्दिष्ट केलेली त्यांची/ तीची कर्तव्य शिक्षक पार पाडतील,आणि
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:हा गुंतवुण घेवु नये,याची सुनिश्चिती शाळा करील.

Self Attested
06/09/2026
PRINCIPAL,
School of Scholars
Kaulkhed,Akola

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मधील विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकाचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खाली ल प्रमाणे होत्या.

| | |
|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | ७६५६ चौ मि. |
| एकुण बांधकाम क्षेत्र | ५९६१.४७ चौ मि. |
| खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | ३८५२.१०चौ मि. |
| वर्गखोल्यांची संख्या | ७८ |
| कार्यालय नि - भंडार - नि - मुख्याध्यापकांची खोली | १० |
| मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे | आहे. |
| पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे. |
| दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | आहे. |
| अध्यापन अध्यायन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामुग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता | उपलब्ध आहे |
| वाचन साहित्य विनयासास उपलब्ध | उपलब्ध आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांविषयक हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल.
१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम,१९५०अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या व्यक्तीच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्या करिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येणार नाही.
१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षीत व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखाविवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.
१६ तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेताक

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | ० | ५ | ० | १ | १ | ८ | ३ | १ | ६ |

असा आहे, हा या कायालर्याशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.
१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करीतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी. किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्य कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सुचनांचे पालन करावे.
१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चीती करावी.
१९. जोडपत्र तिन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

(रतनसिंग पवार)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, अकोला

MANAGER,
School of Scholars,
Kaulkhed, Akola.

27/08/2026

PRINCIPAL,
School of Scholars,
Kaulkhed,Akola.